▶ वर्ष-३
■ अंक-२
www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १४ ऑगस्ट २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

पान-४



पत्रकार संदीप महाजन हल्ला प्रकरण

पान-६

सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा खरात यांना जबरदस्तीने घराबाहेर काढले



पान-७

विकास दिवा स्टेशनच्या पटरीवरून घसरून आपटला



पान-८



दिवा लोकल सुरू करण्याची मागणी

# आयुक्त साहेब... दिवा प्रभाग समितीला टाळे लावा!

**ठाणे** : महापालिकांमध्ये प्रभाग समित्या असतात कशाला?महापालिका मुख्यालयातून नागरिकांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजना त्या त्या प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहचविणे,त्या त्या प्रभागातील अडचणी,प्रश्न,विकास कामे याबाबत देखरेख आणि त्यावर उपाययोजना करणे...विकास कामे करून घेणे...आमच्या माहिती प्रमाणे पालिकेचे अस्तित्व त्या त्या प्रभागात या प्रभाग समित्यांच्या माध्यमातून असते.

महापालिका अस्तित्वात येऊन तीन दशकाहून अधिक काळ लोटला.दिव्यात या प्रभाग समितीच्या अस्तित्वाची काय स्थिती आहे?पाच वर्षांपूर्वी मुंब्रा प्रभाग समिती मध्ये दिवा शहर येत होते... तेव्हा तर स्थिती भयानक होती.आज किमान दिव्याला प्रभाग समिती आहे.पण प्रभाग समिती मधील प्रशासनाचे अस्तित्व दिव्यात किती आहे हा आमचा प्रश्न आहे.


दिवा या दाटीवाटीने वसलेल्या शहरात मोजून दोन प्रमुख रस्ते आहेत. हे रस्ते म्हणजे फार मोठे आहेत अशातला भाग नाही...एकाही रस्त्या वरून लोकांना फुटपाथ वरून चालायला मिळत नाही.किंबहुना दिव्यात चालण्यासाठी फुटपाथ दिसतच नाहीत.प्रचंड गर्दी या दोन्ही रस्त्याच्या दुतर्फा चालत असते.सायंकाळी जणू जत्रा असते...का तर दिवा प्रभाग समितीचे कामचुकार अधिकारी आणि कर्मचारी किमान स्टेशन परिसरातील फेरीवाले हटवून लोकांना चालण्यासाठी फुटपाथ मोकळे करू शकत नाही... असलं प्रशासन हवं कशाला?दिव्यातील शेकडो नागरिक दिवा शहरातील फुटपाथ मोकळे करा आणि लोकांना चालण्या लायक रस्ते मोकळे करा अशी मागणी करतात, मात्र सुस्थावलेले प्रशासन ढिम्म असते...फेरीवाल्यांना बसण्यासाठी आतील कमी गर्दीचे रस्ते दिले किंवा मोकळी मैदाने उपलब्ध करून दिली तर फेरीवाल्यांचा प्रश्नही सुटेल...पण प्रश्न सोडविण्याची मानसिकता आहे कुठे?

परवाच एक ॲम्ब्युलन्स दिवा टर्निंग येथे ट्रॅफिक मध्ये अडकली. सायंकाळी वाहतूक कोंडी ही नेहमीची झाली आहे.

रस्त्याच्या दुतर्फा सायंकाळी बसणारे फेरीवाले रस्ते अडवतात... वाहतूक कोंडी होण्याचे हे प्रमुख कारण आहे.काहीजण अकलेचे तारे तोडतात...म्हणे ही ट्रॅफिक बेकायदा वाहने पार्क केल्याने होते...जर दिव्याची लोकसंख्या वाढली आहे तर वाहने ही वाढणार...वाहने वाढली तर त्यांना पार्किंगसाठी जागा लागणार...जागा नसेल तर रस्त्याच्या एका बाजूला पालिकेनेच जागा उपलब्ध करून द्यायला हवी.बरं दिव्यात अधिकृत पार्किंग आहे कुठे?प्रशासनाने नागरिकांना ती अधिकृत पार्किंग दाखवावी.लोकं तिथे गाड्या पार्क करतील... दिवा शहरात पार्किंगचा प्रश्न गंभीर होणार हे साधारण एक वर्षांपासून आम्ही सांगत आहोत... पण लक्ष देईल ती दिवा प्रभाग समिती कसली?

फुटपाथ चालण्यासाठी आणि रस्ते वाहनांसाठी असतात.रस्त्याच्या एका बाजूला पार्किक की दोन्ही बाजूला फेरीवाले बसवायचे...प्रशासन म्हणून अधिकाऱ्यांना याचा निर्णय घेता येत नसेल तर हे प्रशासन लोकाभिमुख कसे?

हीच अवस्था स्वच्छता निरीक्षकाची आहे.दिवा शहरात गल्ली बोळात कचऱ्याचे ढीग दिसतात.स्वछता विभाग करतो काय ?हा आमचा सवाल आहे. ठाण्यात असे कचऱ्याचे ढीग रस्त्याच्या कडेला दिसत नाहीत, दिवा शहरात फेरफटका मारला तर अनेक ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य दिसते... पालिका प्रशासनाची छाप ज्या काही मोजक्या डिपार्टमेंट मधून लोकांमध्ये दिसते त्याचे टुकार दर्जाचे काम दिवा शहरात पहायला मिळते. येथील प्रशासन लोकाभिमुख नाही.लोकांच्या समस्या जलदगतीने सोडविण्याची भूमिका येथे दिसत नाही.पाण्यासाठी वणवण भटकणारे नागरिक येथील प्रशासनाला दिसत नाहीत आणि म्हणूनच कदाचित येथील वस्तुस्थिती मुख्यालय पर्यंत पोहचत नाही... दिव्याच्या जनतेला एक उत्तम दर्जाचे जीवनमान दिवा प्रभाग समिती मधील प्रशासन देऊ शकत नसेल तर आयुक्त साहेब...दिवा प्रभाग समितीला टाळे ठोका!



दिवा चौकात नेहमीची वाहतूक कोंडी

**दिवा न्यूज सडेतोड / सुहास खंडागळे**

## पाणी विभागाच्या अभियंत्यांचा सत्कार करायला हवा

पालिकेने ज्या नागरी सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत त्यातील किती सुविधा दिवा प्रभाग समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातात. किंवा पालिका ज्या सुविधा देत आहे त्या राबविण्यात येत आहेत की नाही यावर अधिकारी लक्ष ठेवतात?पाण्याची समस्या दिव्यात गेली अनेक वर्षे गंभीर आहे.दिवा प्रभाग समितीत जो पाणी अभियंता आहे, त्याचा खरं तर सत्कार करायला हवा. कोणत्या कॉलेज मधून त्याने पदवी घेतली ती तपासायला हवी.दिव्यात नव्या पाईपलाईन टाकूनही लोकांना पाणी का जात नाही याची माहिती या अभियंत्याने जाहीर सभा घेऊन लोकांनां द्यायला हवी. दिव्यातील पाणी वितरण व्यवस्था मजबूत करण्या ऐवजी ती विस्कळीत दिसते...अनेक नागरिकांचा प्रत्येक रविवार पाण्याची लाईन तपासण्यात जातो.जर पाणी अभियंता येथील पाणी वितरण व्यवस्था सुधारू शकत नसेल तर त्याला आयुक्तांनी माघारी बोलवायला हवे. फक्त खुर्चीवर बसणारे अधिकारी दिवा शहराला परवडणारे नाहीत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | २ | अंक-२
www.diwanews.com

## पत्नीला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला ६ वर्षे सश्रम कारावास

**ठाणे :** मुलगी बहिणीला दत्तक देण्यास नकार दिला याचा राग मनात धरून चाकूने पत्नीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या सोमेश लक्ष्मण कदम या पतीला ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश ए एन शिरसिकर यांनी शुक्रवारी दोषी ठरवत सहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

## रेल्वेच्या तांत्रिक चुकांमुळे दिवा लोकल सुरू होण्यास अडचणी

### फलाट क्रमांक पाच येथून जलदगती मार्गावरून दिवा सीएसएमटी लोकल सुरू करा—आदेश भगत

**दिवा:–** दिवा रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक चार व तीन वरून फलाट क्रमांक एक व दोन च्या रेल्वे लाईनवर जाण्यासाठी क्रॉसिंग उपलब्ध नाही. रेल्वे कडून झालेल्या या चुकीमुळे सद्यस्थितीत दिवा लोकल सुरू करताना अडचणी असून दिवा स्थानक मधून सीएसटीच्या दिशेने सध्याच्या स्थितीत फास्ट लोकल सुरू करावी असे मत दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष आदेश भगत यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना व्यक्त केले.

दिव्यातील जनता रेल्वे सुविधांबाबत गेली अनेक वर्ष संघर्ष करत असून प्रशासनाकडून रेल्वे गाड्यांच्या उपलब्धतेबाबत हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे मत यावेळी आदेश भगत यांनी व्यक्त केले.रेल्वेने दिवा शहरातील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन दिवा शहरातून स्वतंत्र लोकल सुरू करायला हव्यात.या लोकल सुरू करताना तांत्रिक अडचणी सांगण्याचे काम रेल्वेने करू नये. सध्या ज्या काही तांत्रिक अडचणी लोकल सेवा सुरू करण्यासाठी येत असतील त्या रेल्वे प्रशासनामुळेच आहेत. परिणामी तांत्रिक अडचणी बाजूला ठेवून उपलब्ध असणाऱ्या बाबी लक्षात घेऊन येथून लोकल सोडण्याच्या दृष्टीने उपाययोजना रेल्वेने कराव्यात असे आदेश भगत म्हणाले.दिवा स्थानकातून सध्याच्या घडीला फलाट क्रमांक पाच वरून लोकल सोडल्यास ती लोकल फास्ट ट्रॅकवरून धावू शकते आणि ही लोकल ठाण्यापुढे स्लो केल्यास त्याचा फायदा नागरिकांना होऊ शकतो. रेल्वे प्रशासनाने अशा अनुषंगाने विचार करून दिवा रेल्वे स्थानकातून स्वतंत्र लोकल सेवा सुरू करावी अशी मागणी आदेश भगत यांनी केली.

## डॉ. महाजन यांच्या रुग्णालयात ९ वर्षांच्या मुलीवर मेंदूची यशस्वी शस्त्रक्रिया

**दिवा:–**दिव्यातील डॉक्टर महाजन यांच्या एस हॉस्पिटलमध्ये आर्या पटेल या नववर्षीय मुलीच्या मेंदूच्या ट्यूमरचे यशस्वी ऑपरेशन पार पडले.डॉ.पारेख यांनी हे ऑपरेशन केले.सदर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली.डॉक्टर महाजन यांच्या रुग्णालयात आर्या पटेल ही डोकेदुखीच्या आजारामुळे त्रस्त होऊन तपासणीसाठी पालकांसह आली होती. तपासणी दरम्यान डॉक्टर महाजन यांनी तातडीने निदान केले.आर्या पटेल हिला छोट्या मेंदूचा ट्यूमर असल्याचे तपासणी दरम्यान आढळले. त्यानंतर ५- ७-२०२३ च्या रात्री आर्याला ॲडमिट करण्यात आले. निदान जलद गतीने झाल्याने उपचार ही जलद गतीने सुरू झाले. त्यानंतर डॉक्टर महाजन यांनी आर्या पटेल हिला त्यांच्याच कल्याण येथील एस हॉस्पिटल येथे ॲडमिट केले.डॉक्टर समीर पारेख यांनी आर्या पटेलचे यशस्वी ऑपरेशन केले. मुलगी दुसऱ्या दिवशीच चालू लागली.सदर शस्त्रक्रिया दुर्बिणीतून पार पडली.आर्या वर डॉक्टरांच्या मार्गदर्शकाखाली पुढील उपचार सुरू आहेत.



## दापोली कृषी विद्यापीठाचे केंद्र पालघर जिल्ह्यात सुरू होणार

**पालघर :** दापोली कृषी विद्यापीठाने पालघर जिल्ह्यात मंजूर केलेले प्रस्तावित केंद्र सुरू करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री व पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी नुकतेच दिले.जिल्हा नियोजन विकास समितीच्या (डीपीडीसी) बैठकीत कोकण पदवीधर मतदारसंघातील आमदार निरंजन डावखरे यांनी हा मुद्दा मांडला होता. पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन व संशोधन करण्यासाठी दापोली कृषी विद्यापीठाने केंद्र मंजूर केले आहे. मात्र, ते अद्यापी सुरू करण्याची कार्यवाही झालेली नाही, याकडे आमदार निरंजन डावखरे यांनी लक्ष वेधले. त्यानंतर पालकमंत्री चव्हाण यांनी केंद्राबाबत कार्यवाहीचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले.

कौशल्य विकास अंतर्गत वारली पेंटीग, रानभाज्या, चिकू, नाचणी, केळी आणि बांबूसंदर्भात केंद्र सरकारच्या माध्यमातून आर्थिक साह्य देऊन मुलांना मार्गदर्शन करावे, 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट'नुसार जिल्ह्यासाठी चिकू वा बांबूसंदर्भात जीआय मार्किंग करावे, २०४७ पर्यंत भारत सिकलसेल एनीमिया मुक्त करण्याच्या अभियानात देशातील १५७ जिल्ह्यात सुरू होणारी वैद्यकीय व नर्सिंग कॉलेज पालघर जिल्ह्यात मंजूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, केंद्राच्या

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :–**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## कळवा रुग्णालयाच्या दुरावस्थे प्रकरणी महापालिका आयुक्तांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करा—संजय घाडीगांवकर

**ठाणे:–**शिवाजी महाराजांच्या नावाने असणाऱ्या कळवा रुग्णालयात महापालिका सर्वसामान्य नागरिकांना पुरेशा सोयी सुविधा देत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. कळवा रुग्णालयासाठी वारंवार दुरुस्ती आणि इतर सामग्री साठी पाच वर्षात देयक काढले आहेत हे पाहता विद्यमान महापालिका आयुक्त यांच्यावर खरी जबाबदारी निश्चित केली पाहिजे अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगांवकर यांनी केली आहे.

स्वतःला अनाथांचा नाथ म्हणवून इव्हेंट करणारे मुख्यमंत्री मागील २० वर्षात कळवा रुग्णालयाच्या प्रशासनाला शिस्त लावू शकले नाहीत.नागरिकांना सुविधा देऊ शकले नाहीत. महापालिकेच्या नागरी सुविधा च्या भूखंडावर जी रुग्णालये उभी आहेत त्या रुग्णालयांमध्ये महापालिकेसाठी राखीव जागा उपलब्ध करून देऊ शकलेले नाहीत हे मुख्यमंत्र्यांचे अपयश असून ठाणेकरांचे आरोग्य धोक्यात येण्यास यांची दूरदृष्टी विहित धोरणे कारणीभूत होत असल्याचा आरोप संजय घाडीगावकर यांनी केला आहे. निधीतून वैद्यकीय कारणासाठी १०० कोटी वाटल्याचा गवगवा मुख्यमंत्री करतात आणि त्याच मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात योग्य उपचाराअभावी महापालिका रुग्णालयात ३ दिवसा २२ रुग्ण दगावतात ,किती हा मोठा विरोधाभास आहे असा सवाल घाडीगावकर यांनी उपस्थित केला आहे. कळवा रुग्णालयात अपुरा स्टाफ आहे वैद्यकीय अधिकारी नर्स यांची कमतरता आहे येथील स्थानिक कर्मचाऱ्यांनी येथील सोयी सुविधा बाबत पाढा वारंवार महापालिका प्रशासनाकडे वाचलेला असताना सुद्धा त्यावर उपाययोजना होत नसतील तर याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी निश्चिती करून महापालिका आयुक्तांचा राजीनामा मुख्यमंत्री घेतील काय ? ज्या पद्धतीने महापालिका रुग्णालय आणि महापालिका इमारती या खाजगीकरणाच्या नावाखाली ज्या सामाजिक संस्थांना देण्याचा घाट चाललेला आहे आणि होत आहे ते पाहता सामान्य नागरिकाला आरोग्य सुविधा भेटणं हे ठाण्यात दुर्लभ होऊ चाललेले आहे , आतापर्यंतचा अनुभव पाहता ज्या संस्थांना महापालिकेची रुग्णालय इमारती दिलेल्या आहेत तेथे सामान्य ठाणेकर नागरिकांना हजारो रुपये खर्च करून नागरी सुविधा घ्याव्या लागत आहेत हे कटू सत्य आहे आणि हे मुख्यमंत्री का बदलू शकलेले नाहीत ?असा सवाल संजय घाडीगावकर यांनी केला आहे.तसेच ज्या पद्धतीने आपल्या मित्र वर्गाला आणि जवळच्या लोकांशी संबंधित असलेल्या संस्थांना महापालिकेच्या वास्तू देण्याचा घाट आहे तो प्रकार इथेही नाही ना म्हणून कळवा हॉस्पिटलला सुविधा किंवा उपाययोजना न करता या पद्धतीने घटना घडवून खाजगीकरण करण्यामागे हेतू तर नाही ना असा संशय घाडीगांवकर यांनी व्यक्त केला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669




ठाणे: घोडबंदर रोड, ठिकाणी पातलीपाडा सर्कल वरून हिरानंदानी इस्टेटकडे जाणाऱ्या रस्त्यावरती स्ट्रीट लाईट पोल पडल्याचा प्रकार बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास समोर आला. तो पोल नेमका कसा पडला हे समजू शकले नसून तो अनोळखी वाहनाच्या धडकेने पडल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ठामपा विद्युत वायरमन व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेत एका बाजूला केला आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# अशोक सोळंकी यांच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन

**दिवा:-** दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने दिवा भाजपच्या गुजराती सेलचे अध्यक्ष अशोक सोलंकी यांच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या शिबिरात फुल बॉडी चेकअप, विविध रोगांवर आयुर्वेदिक उपचार, डायबिटीज, ब्लडप्रेशर, किडनी स्टोन,सायनस, थायरॉईड इत्यादी आजारावर मोफत उपचार व मार्गदर्शन नागरिकांना मिळणार आहे. सदर शिबिर नितेश अपार्टमेंट २, बेडेकर नगर, दिवा आगासन रोड, दिवा पूर्व येथे १५ ऑगस्ट रोजी सकाळी दहा ते दोन या वेळेत करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन अशोक सोलंकी यांनी केले आहे. कार्यक्रमास दिवा भाजप महिला अध्यक्षा ज्योती पाटील, तुकाराम मुंडे, विजय कुराडे,डॉक्टर नीरज सिंग, सदानंद घाडी व नितेश अपार्टमेंटचे रहिवाशी यांनी सहकार्य केले असल्याची माहिती अशोक सोलंकी यांनी दिली. या शिबिरात डोळ्यांची मोफत तपासणी करण्याबरोबरच चष्मा व मोतीबिंदूचे मोफत ऑपरेशन केले जाणार आहे. त्याचबरोबर सरकारी कागदपत्रे डोमेसाईल सर्टिफिकेट, ज्सीनियर सिटीजन सर्टिफिकेट, हेल्थ कार्ड, झिरो बॅलन्स अकाउंट, आधार कार्ड करेक्शन, पॅन कार्ड करेक्शन त्याचबरोबर नवीन पॅन कार्ड काढणे, ई- श्रम कार्ड इत्यादी कागदपत्रे नाममात्र फी घेऊन बनवून दिली जाणार आहेत.या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अशोक सोलंकी यांनी केले आहे.

# दिवा लोकल आंदोलन प्रकरण

# महिलांवरील गुन्हे रद्द करा

## भाजपच्या ज्योती पाटील यांची मागणी

**दिवा:-** बुधवारी ९ ऑगस्ट रोजी दिवा रेल्वे स्थानकात लोकलच्या गोंधळामुळे महिला प्रवाशांनी मोटरमन च्या केबिनमध्ये प्रवेश केला होता.यानंतर दीपिका शिंदे या महिलेवर गुन्हा दाखल झाला. सदर प्रकार गर्दीमुळे झाला असल्याने दाखल झालेले गुन्हे रद्द करावेत अशी मागणी दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

दिव्यात बुधवारी ९ ऑगस्ट रोजी सकाळी फलाट क्रमांक चार वर येणारी लोकल दोन वर आल्याने प्रवाशांचा एकच गोंधळ उडाला. या गोंधळामध्ये गर्दी झाल्याने एक महिला मोटरमन केबिनमध्ये चढली. त्यानंतर १५ ते २० मिनिटं लोकल थांबून होती.मोटरमनच्या केबिनमध्ये प्रवेश करणारी महिला दीपिका शिंदे हिच्यावर रेल्वे ऍक्ट नुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून तिची जामीनावर सुटका करण्यात आली आहे. मात्र या महिलेने जाणीवपूर्वक कोणते कृत्य केले नसून गर्दीच्या वेळी झालेला हा प्रकार असल्याने सदर महिलेवर दाखल झालेले गुन्हे रद्द करावेत अशी मागणी दिवा भाजपच्या महिला अध्यक्ष ज्योती पाटील यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे. या संदर्भात दिवा स्टेशन मास्तर यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला असून आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याचे ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

# शिवसेनेतर्फे दिव्यांग नागरिकांना मोफत साहित्य वाटप

**दिवा:-** मा. उपमहापौर शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग सहायता शिबिरातील मोफत साहित्य वाटप नुकतेच तिसाई नगर शाखा येथे करण्यात आले.

या शिबिरात दिव्यांग नागरिकांनी सहभाग घेतला.शिबिरात १३ दिव्यांग ना मोफत व्हील चेअर,काहींना सर्जिकल शूज, वाकिंग स्टिक मोफत देण्यात आले. तसेच २५ जणांना मोफत साहित्य देण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन निलेश म्हात्रे यांनी शिवसेनेच्या तिसाई नगर शाखेच्या वतीने करण्यात आले होते. सदर वाटप शहरप्रमुख मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी शिवसेनेचे मा. नगरसेवक दीपक जाधव, चरणदास म्हात्रे, उमेश पाटील, शशिकांत पाटील, विनोद मढवी, राजेश पाटील, सचिन चौबे, भूषण म्हात्रे, मनोज खंडागळे, शैलेश भगत, तसेच शिवसेनेच्या दिवा शहर युवती प्रमुख साक्षी मढवी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अन् कोर्ट नाक्यावर अवतरली पंढरी



**ठाणे-** वारी समतेची... वारी मानवतेची, या संकल्पनेवर आधारित वैष्णवांचा मेळा आज ठाण्याच्या संविधान चौकात पार पडला. राज्याच्या विविध भागातून वारकऱ्यांची प्रभुअळी या ठिकाणी जमा झाल्याने ठाणे नगरीमध्ये पंढरी अवतरल्याचे चित्र दिसून आले.

ओबीसी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा ओबीसी एकीकरण समितीचे निमंत्रक प्रफुल वाघोले आणि मराठा सेवा संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष मंगेश आवळे यांनी या समतामूलक प्रबोधन वारीचे आयोजन केले होते. कमला एकादशीचे औचित्य साधून ठाणे शहरातील कोर्ट नाका येथील संविधान चौकामध्ये वारी समतेची ... वारी मानवतेची या सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्यामध्ये छत्रपती शिवाजीमहाराज आणि जगद्रू संत तुकाराम या गुरूशिष्याच्या भेटीचा जीवंत देखावा चितारण्यात आला होता. तसेच, संतांचे अभंग, महापुरुषांचे विचार यांचे फलक घेतलेले वारकरी सहभागी झाले होते. अश्व रिंगण हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण होते. आषाढी-कार्तिकी वारीत ज्या प्रमाणे अश्व रिंगण होते, त्याच पद्धतीने या ठिकाणी अश्व रिंगण करण्यात आले. विशेष म्हणजे या अश्वावर छत्रपती शिवाजीमहाराज यांची वेशभूषा केलेला तरूण आरूढ झाला होता. तसेच आळंदी येथून आलेली संत ज्ञानेश्वरांच्या पादुकांची पालखी देखील सहभागी झाली होती. या अश्व रिंगण सोहळ्यात सुमारे पाचशे वारकरी सहभागी झाले होते. त्यामध्ये महिला व बाल वारकऱ्यांचा सहभाग लक्षणीय होता. या वारकऱ्यांनी नंतर कोर्ट नाका ते टाऊन हॉल अशी दिंडी काढून विठूरायाला वंदन केले. टाऊन हॉल येथे ज्येष्ठ निरुपणकार आणि संत साहित्य अभ्यासक श्यामसुंदर सोन्नर आणि ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते यांनी प्रवचन केले.

या वारी सोहळ्याचे आयोजक प्रफुल वाघोले यांनी या सोहळ्याची संकल्पना सांगताना संतांनी मानवतेचा विचार दिला होता. त्याचीच री ओढत महापुरूषांनीही सकल मानव जातीच्या कल्याणाचा विचार मांडला. त्याच विचारांचा जागर करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाणे शहरात प्रथमच अश्व रिंगण पार पडले, असे सांगितले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | ४ | अंक-२
www.diwanews.com

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची नवीन संस्थांसाठी अभ्यासकेंद्र मागणी प्रक्रियेस मुदतवाढ!!

**मुंबई:-** मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर येथील पारंपारिक विद्यापीठाची मान्यता मिळालेल्या अनुदानित/ विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांसाठी विविध शिक्षणक्रमांसाठी अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रिया राबविण्यांत येत आहे. प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी शासनमान्य संस्थांकडून अर्ज मागणी करण्याची मुदत दिनांक १७ ऑगस्ट २०२३ पर्यंत वाढवण्यात आलेली आहे

# पत्रकार संदीप महाजन हल्ला प्रकरणी ठाण्यात पत्रकारांची निदर्शने

## काळ्या फिती बांधून नोंदवला निषेध

**ठाणे:** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे स्वातंत्र्य सैनिकाचे वारस असलेले ज्येष्ठ पत्रकार संदीप महाजन यांना समाजकंटकांनी बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार पत्रकारांच्या न्याय हक्काची पायमल्ली आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली जात आहे. त्याविरोधात शुक्रवारी ठाणे शासकीय विश्रामगृह येथे शहरातील विविध पत्रकार संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांनी काळ्याफिती बांधून जोरदार निर्दशने केले. यावेळी हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.

ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत निदर्शने केली. यावेळी, हल्लेखोरांवर कठोर कारवाई झाली पाहिजे ,तसेच आमदार किशोर पाटील यांच्यावर देखील कारवाईची मागणी आंदोलनकर्त्या पत्रकारांनी केली. तसेच कारवाई न झाल्यास मंत्रालय या ठिकाणी ठिय्या मांडण्याचा देखील इशारा यावेळी पत्रकारांनी दिला. तसेच या हल्ल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना देखील ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.



# टीएमटी कर्मचाऱ्यांची १६० कोटीची थकबाकी

## टीएमटी एप्लॉईज युनियन घालणार मुख्यमंत्र्यांना साकडे

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या परिवहन (टीएमटी) सेवेतील कर्मचाऱ्यांची तब्बल १६० कोटींची थकबाकी येणे आहे. सातव्या वेतन आयोगापोटी १२० कोटी थकबाकी असुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे २७ कोटींचे निवृत्ती उपदानही थकीत आहे. तेव्हा, ठाणे महापालिकेच्या आस्थापनेत सामावुन घ्या तसेच थकबाकी द्यावी. या मागण्यांसाठी गुरुवारी टीएमटी एप्लॉईज युनियनच्या झेंड्याखाली शेकडो टीएमटी कर्मचाऱ्यानी एकजुटीचे दर्शन घडवत वागळे आगारात शक्तीप्रदर्शन केले. यावेळी युनियनचे अध्यक्ष गणेश देशमुख, सरचिटणीस शिवाजी शिंदे, उपाध्यक्ष मोहन मुणगेकर,संतोष न-हे, कार्यकारी चिटणीस विजय बाम्हणे,चिटणीस विश्वास निकम आणि खजिनदार जानु खुरकुटे आदीसह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित राहून घोषणाबाजी केली. दरम्यान, थकबाकीसह विविध मागण्यांसाठी येत्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालणार असल्याचे युनियनने सांगितले.

धर्मवीर आनंद दिघे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या परिवहन (टीएमटी) सेवेची सुरुवात फेब्रुवारी १९८९ मध्ये झाली. पण आज टीएमटी अक्षरशः गाळात रुतली असुन महापालिकेच्या अनुदानावरच टीएमटीचा डोलारा उभा आहे. टीएमटीने सादर केलेल्या ५६७.९१ कोटीच्या अर्थसंकल्पात तब्बल ४६० कोटी




५४ लाखांच्या अनुदानाची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाने केवळ वेतनापुरतेच अनुदान मंजुर केल्याने टीएमटीच्या शेकडो कर्मचाऱ्यांची अनेक वर्षापासुनची कोट्यवधीची थकबाकी शिल्लक आहे.या तसेच, ६१३ कर्मचा-यांना कायम करणे,१२ व २४ वर्षाच्या आश्वासित वेतन श्रेणीचा लाभ देणे, ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी आदी मागण्यांसाठी टीएमटी एम्प्लॉईज युनियनने दंड थोपटले आहेत. टीएमटीमधून अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. येत्या काही वर्षात बरेचसे कर्मचारी निवृत्त होणार आहेत. त्यांना दयावयाचे उपदान, सेवानिवृत्ती वेतन व रजेचा पगार देणे आवश्यक आहे. त्यासाठी वेळोवेळी ठाणे महापालिकेकडे निधीची मागणी करावी लागते. त्याऐवजी परिवहन सेवेचा अर्थसंकल्प ठाणे महापालिकेमध्ये वर्ग केल्यास किंवा परिवहन सेवेच्या कर्मचा-यांना ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेतल्यास परिवहन सेवेकडील कर्मचा-यांना त्यांची भविष्याविषयी भेडसावणारी काळजी कायमस्वरुपी नाहीशी होऊन जीवन सुखकारक होईल.अशी अपेक्षा व्यक्त करून टीएमटी एम्प्लॉईज युनियनने सनदशीर लढा देण्याचे ठरवले आहे.त्यानुसार, आधी परिवहन सभापती विलास जोशी यांना तसेच माजी महापौर नरेश म्हस्के यांना निवेदन दिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालण्याचा निर्धार बोलुन दाखवला.

### थकबाकीची कोटी कोटी उड्डाणे

**टीएमटी कर्मचाऱ्यांची १६० कोटींची थकबाकी आहे. यात सातव्या वेतन आयोगापाटी सन २०१६ पासून ते नोव्हेंबर २०२२ पर्यन्त १२० कोटी थकबाकी असून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना निवृत्ती उपदान मे २०२३ पर्यन्त २७ कोटी देणे आहे.जानेवारी २०१६ नंतर सेवानिवृत्त / स्वेच्छा निवृत्त कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार उपदान व अर्जित रजा वेतनाचा फरक अशी २५.६० कोटी थकबाकी आहे.महागाई भत्यापोटी १६.६० कोटी,सार्व.सुट्याच्या वेतनापोटी १०.९० कोटी, वैद्यकिय भत्ता ५.४० कोटी,रजा प्रवास भत्ता १० कोटी, शैक्षणिक भत्ता २३.२६ लक्ष, प्रोत्साहन भत्ता ५८ लक्ष,सहाव्या वेतन आयोगापोटी ५५ कोटी येणे बाकी असल्याचे युनियनने स्पष्ट केले.**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | ५ | अंक-२
www.diwanews.com

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात पंचप्रण शपथ उपक्रम उत्साहात संपन्न

ठाणे : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ''माझी माती माझा देश'' या अभियानांतर्गत पणती प्रज्वलित करुन 'पंचप्रण शपथ' जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.याप्रसंगी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गोपीनाथ ठोंबरे, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, तहसिलदार संजय भोसले तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# ... तर गोरगरीबांचे जीव वाचतील अन् पदरात पुण्य पडेल



## -डॉ.जितेंद्र आव्हाड यांचा सल्ला

**ठाणे:** जितोला कॅन्सर युनिट देता, आपण करोडो रुपयांच्या जमिनीचा ताबा आरोग्य व्यवस्थेच्या नावाखाली देता. त्यातीलच काही कोटी रूपये जर छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाला दिले तर अनेक गरिबांचे जीव वाचतील आणि त्यामुळे आपल्या पदरात पुण्य पडेल. शहरातील रंगरंगोटी आणि लायटींगवर खर्च करून शहर स्मार्ट होणार नाही. त्यासाठी शहराची आरोग्य व्यवस्थाही सक्षम करावी लागते, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत लगावला. दरम्यान, ३०% कमिशनच्या हव्यासापोटी अनेक तपासण्या करण्यासाठी रूग्णांना बाहेर पिटाळले जाते, असा आरोपही त्यांनी केला.

दररोज शेकडो रुग्णांची वर्दळ असलेल्या ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अनागोंदी माजली आहे. बेड नसल्याचे कारण सांगून रूग्णांना दाखल करून घेतले जात नाही. परिणामी दूरवरून आलेल्या रुग्णांवर उपचार होतच नाहीत. गुरूवारीही तसाच प्रकार सुरू असल्याची माहिती येथे उपचारासाठी आलेल्या रूग्णांनी डॉ.जितेंद्र आव्हाड यांना फोनवरून दिली. ही माहिती मिळताच डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी तडक छत्रपती शिवाजीमहाराज रूग्णालय गाठून पाहणी केली होती. त्यानंतर आज पत्रकार परिषद घेऊन डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी व्यवस्थापनावर चांगलीच आगपाखड केली.यावेळेस जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्षा सुजाताताई घाग, युवक अध्यक्ष विक्रम खामकर आदी उपस्थित होते.

डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, गेली तीस वर्षे जे ठाणे महानगर पालिकेच्या सभागृहामध्ये सत्तेत बसले आहेत, त्यांनी काय केले? असा आपला सवाल आहे. गुरूवारी रात्री आपण जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात गेलो. तेव्हा, रूग्णालयात कुत्रे फिरताना दिसत होते. या कुत्र्यांनी रूग्णालयात शी केलेली सु केलेली दिसत होती. रूग्णांना बाहेर बसण्यासाठी जे कठडे तयार केले आहेत. त्यावरही रूग्ण झोपले होते. त्यावर झोपलेल्या एका रुग्णाने आपल्याकडे १२ तास कोणीही लक्ष दिलेले नाही, असे सांगितले. डॉक्टरांशी रुग्णाने संवाद साधल्यावर आता वेळ नाही, उद्या ये असे सांगितले जाते. मृत्यू हा सांगून येत नाही. त्यामुळेच डॉक्टर्सची उपलब्धता २४ तास असावी, असा अलिखित नियम आहे. पण, इथे सर्व बोंबाबोंब आहे. छत्रपती शिवाजीमहाराज रूग्णालयात पंख्याखाली बेड देण्यासाठी चक्क ५०० रूपये मागितले जात आहेत. या रूग्णालयात उपचारासाठी गोरगरीब, मागासवर्गीय रूग्ण जात असतात. त्यांचा अप्रत्यक्ष छळच केला जात आहे. ठाणे शहर स्मार्ट केले जात आहे. शहरात ठिकठिकाणी रंगरंगोटी, लाईटींग केली जात आहे. त्यासाठी कोट्यवधी रूपयांचा खर्च केला जात आहे. त्यापेक्षा इथल्या गरिब रूग्णांच्या जीवाशी खेळ होऊ नये, म्हणून त्या पैशाचा वापर आरोग्य सुविधांसाठी केला गेला तर ठाणेकर आयुष्यभर आपले उपकार मानतील, असा सल्लाही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

रूग्णालयात जेवणासाठीही रूग्णांना घरातून वाडगे आणायला सांगितले जाते. पोषक आहार म्हणून मनोरुग्णालयात अंडी देण्यात येत असतात. इथे कोंबडीच अंडी घेऊन जाते की काय? असा सवालही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला. ३० % कमीशन मिळवण्यासाठी रक्त, लघवी, विष्ठा बाहेरून तपासून आणण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना सांगितले जाते. आपण सन २०१४ मध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री असताना हे रूग्णालय शासनाकडे वर्ग करावे, असे सुचवले होते. कारण, आज सायन, केईएम, नायर आणि जेजे या रूग्णालयात उत्कृष्ट सेवा मिळत आहे. त्यामागे शासनाची यंत्रणाच महत्वपूर्ण ठरत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही या प्रस्तावास अनुकूलता दर्शविली होती. पण, तो प्रस्ताव पुढे सरकलाच नाही. आजची या रुग्णालयाची अवस्था पाहून असे वाटते की, गरिबांना जगण्याचा अधिकार नाही का? गरिबांना उत्तम आरोग्य व्यवस्था मिळवण्याचा अधिकार नाही का? येथील सुतिकागृहात गरोदर महिला खुर्चीवर बसलेल्या असतात. तिथेच रक्तस्राव होऊन अनेक गर्भवती दगावतात. म्हणूनच मुख्यमंत्र्यांना आपण हात जोडून विनंती करतो की, आपण आपल्या शहराचे उत्तरदायित्व म्हणून छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाचा चेहरा मोहरा बदलला पाहिजे. या मध्ये आपणाला राजकारण करायचे नाही. पण, एवढेच सांगायचे आहे की, जितोला कॅन्सर युनिट देता, आपण करोडो रुपयांच्या जमिनीची ताबा देता; त्याच्यातले काही करोडो रुपये जर कळवा हॉस्पिटलमध्ये दिले तर अनेक गरिबांचे जीव वाचतील आणि आपल्या पदरात पुण्य पडेल. चुकीच्या माणसांच्या हातात रूग्णालय आणि परिवहन सेवा गेल्याने ही दुर्दशा झाली आहे, असेही ते म्हणाले. गुरूवारी छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात गेलो. तेव्हा परिस्थिती पाहून माझा संताप अनावर झाला होता. आपण ते बोलूनही दाखवले. मात्र, आपलं चिडणं स्वाभाविक होते. तिथे माझे आई-वडील, पोरं बाळ तिथे ॲडमिट नाहीत. जर गरिबांसाठी माझा जीव तुटत नसेल गरिबांसाठी मी चिडत नसेल तर मला जगण्याचा अधिकार नाही, असेही डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले.

### मुख्यमंत्री शिंदे यांनी जीवघेणी रिस्क घेऊन नये

हवामान खराब असताना हेलिकॉप्टरने प्रवास करू नये. हा साधारण जगभरातला अलिखित नियम आहे. हवामान खराब असल्यानेच आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वायएसआर रेड्डी यांचा हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री वैयक्तिकरित्या 'मुख्यमंत्री' म्हणून माझ्याशी कसेही वागत असोत, ती त्यांची राजकीय भूमिका आहे. पण, ते आधी माझे मित्र होते. त्यांनी हवामान खात्याचा हिरवा कंदील नसताना हेलिकॉप्टरने उडवू नये. ते जीवघेणे ठरू शकते. मी त्यांना एवढीच विनंती करतो की, तुम्ही अशी रिस्क घेत जाऊ नका. शेवटी तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहात. मुख्यमंत्री ज्या मार्गाने साताराकडे गेले. त्या मार्गात सह्याद्रीच्या डोंगररांगा आहेत. जर धुक्यामुळे डोंगररांग दिसली नाही तर अनर्थ घडू शकतो. म्हणू त्यांनी अशी कृती करू नये, अशी आपली विनंती आहे, असे डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले.



*जितेंद्र आव्हाड यांनी स्वत:कडे लक्ष वेधून घेण्यासाठी केलेला हा सर्व स्टंट असून स्वत:च्या टीमक्या वाजवून विनाकारण आमच्या मुख्यमंत्र्यांवर टीका करणे बंद करा.सिव्हिल रुग्णालय स्थलांतरित झाल्याने साहजिकच रुग्णांचा ओढा हा महापालिका रुग्णालयात वाढलाय त्यामुळे प्रचंड ताण वाढलाय तरीही डॉक्टर्स त्यांच्यापरीने प्रचंड काम करतायत. उगाचच टीका करू नका अजितदादा नी जे इंजेक्शन मारल आहे त्याच्या मुळे जे गर्भगळीत झालेत त्याच्यावर उपचार करण्यासाठी त्यांनी शोधावं चार ठिकाणी जावं त्यावर काही उपाययोजना करण्याऐवजी विनाकारण डॉक्टरांवर टीका करण त्यांना धारेवर धरण हे बंद करून स्वत:च्या पक्षाकडे पाहावे.*

– नरेश म्हस्के,
प्रवक्ता शिवसेना ( शिंदे गट)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | ६ | अंक-२



## मृत्यूची सर्वस्वी जबाबदारी सरकारची – खासदार विचारे

**ठाणे:** कोविड काळात कसलीच कमतरता नव्हती. मात्र आता लोकप्रिनिधी नसल्याने प्रशासनाचा भोंगळ कारभार सुरू आहे. अशी टिका ठाण्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांनी केली. तर, या १८ जणांच्या मृत्यूची सर्वस्वी जबाबदरी सरकारची आहे. गतिमान सरकार म्हणून बोलत आहेत. पण आरोग्य यंत्रणा फेल दिसत आहे.अशी टिका ही खासदार विचारे यांनी केली.

# सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा खरात यांना जबरदस्तीने घरातून बाहेर काढले





**दिवा:**–दिव्यात रेश्मा खरात या सामाजिक कार्यकर्त्या असणाऱ्या महिलेला घरातून सामानासह जबरदस्तीने बाहेर काढण्याच्या निषेधार्थ रेश्मा खरात व दिव्यातील विविध सामाजिक संघटनांनी रेल्वे स्टेशन येथे रविवारी सकाळपासून आंदोलनात सुरुवात केली.

रेश्मा खरात यांनी ज्या घराचा व्यवहार केला होता, तेच घर भारतीय जनता पार्टीच्या एका पदाधिकाऱ्याने नंतर विकत घेऊन कागदपत्रे आपल्या नावावर करत आता रेश्मा खरात यांना घरातून बाहेर काढण्याचा आरोप रेश्मा खरात यांनी केला आहे. मी घर विकत घेतलेले आहे हे माहित असताना व घराच्या मोबदल्यात संबंधित घर मालकाला पैसे दिलेले असतानाही मला जबरदस्तीने घरातून बाहेर काढण्याचे षडयंत्र करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी रेश्मा खरात यांनी केली आहे.रेश्मा खरात यांच्या समर्थनार्थ दिव्यातील अनेक सामाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते अमोल केंद्रे यांसह अनेकांनी रेश्मा खरात यांची बाजू घेत आंदोलनात सहभाग घेतला. दरम्यान रेश्मा खरात यांनी केलेले सर्व आरोप भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी केळशीकर यांनी फेटाळले आहेत.मात्र आपण हे घर संबंधित मालकाकडून आधी खरेदी केले होते व संबंधित मालकाला त्याबाबतचे रक्कम त्याच्या खात्यावर पाठवली होती असे रेश्मा खरात यांनी म्हटले आहे. आपण घर घर खरेदी केलेले आहे हे माहीत असतानाही अन्य कुणी ते खरेदी करून डॉक्युमेंट नावावर करत असेल तर आम्ही सामान्य माणसाने जायचं कुठे? असा सवाल रेश्मा खरात यांनी केला आहे. रेश्मा खरात यांनी याबाबत संताप व्यक्त केला असून अशा पद्धतीच्या फसवणुकीमुळे सामान्य नागरिकांचे आयुष्य उध्वस्त होऊ शकते असेही त्यांनी म्हटले आहे. रेश्मा खरात यांना न्याय द्या अशी मागणी आता दिव्यातील नागरिक करत आहेत.

# अखेर 'एसआरए' विभागाला मिळाला आयएएस अधिकारी

## पराग सोमण

### झाले मुंबई महानगर प्रदेश मुख्य कार्यकारी अधिकारी

### झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कामाला मिळेल गती



**ठाणे :** गेल्या काही वर्षांपासून मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे विभागाचे (एसआरए) मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद रिक्त होते. त्या रिक्त पदी पराग सुरेश सोमण यांची वर्णी लागल्याने अखेर ठाणे एसआरए विभागाला त्यांच्या रूपाने आयएएस अधिकारी मिळाला आहे. (पराग सोमण हे निवड श्रेणी अप्पर जिल्हाधिकारी मधून आयएएस अधिकारी झाले आहेत.) एसआरए ठाणे ला मिळालेले पराग सोमण हे बहुदा पहिलेच आयएसए अधिकारी ठरले आहेत. यामुळे जिल्ह्यातील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कामाला गती मिळणार आहे. सोमण हे औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल उपायुक्त म्हणून कार्यरत होते. ते अप्पर जिल्हाधिकारी निवड श्रेणीत आयएएस झाले आहेत.

ठाण्याच्या एसआरए विभागाला आयएसए अधिकारी मिळावा अशी मागणी ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांनी लावून धरली होती. तसेच आमदार केळकर यांनी याबाबत अधिवेशनात आवाज ही उठवला होता. त्याच ठाणे विभागात रिक्त असलेल्या जागेमुळे एसआरएच्या कामांना विलंब होत होता. त्या विलंबला आता पूर्ण विराम मिळाला आहे.

नुकतीच सोमण यांची ठाणे विभागाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून वर्णी लागली असून त्यांनी या पदाचा पदभारही स्वीकारला आहे. सोमण यांनी यापूर्वी पुणे , सातारा, सांगली आणि सोलापूर येथे निवासी उपजिल्हाधिकारी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, रोहयो विभागाचे उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि विशेष भूसंपादन अधिकारी म्हणून पद भूषवले आहे. तर अप्पर जिल्हाधिकारी (संवर्ग) म्हणून नागपूर विभाग उपायुक्त (करमणूक) , तसेच उस्मानाबाद येथे अप्पर जिल्हाधिकारी म्हणून कामाची समर्थ्यपणे जबाबदारी बजावली आहे. तसेच अप्पर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) महसूल उपायुक्त कार्यरत होते. सोमण यांची आता पर्यंत २५ वर्ष १ महिने शासकीय सेवा पूर्ण झाली आहे.

आता ते मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे विभागाचे (एसआरए) मुख्य कार्यकारी अधिकारी रुजू झाले आहेत. या परिसरातील आठ महानगरपालिका,आठ नगरपालिका आणि एक ग्रामपंचायत इतका कार्यक्षेत्राचे ते प्रमुख असणार आहेत. त्यामुळे या विभागाच्या कामांना गती मिळेल असे बोलले जाऊ लागले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | ७ | अंक-२

www.diwanews.com

## ठाण्यातील १५ तलावांचे रूपडे पालटणार

ठाणे :तलावांचे शहर म्हणून ओळख असलेल्या ठाणे शहरातील तलावांचे संवर्धन व जतन करण्यासाठी विविध कामे ठाणे महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येतात. याच मालिकेत, केंद्र शासनाच्या माध्यमातून अमृत-२ योजनेतंर्गत एकूण १५ तलावांच्या संवर्धन व सुशोभीकरण या कामांच्या निविदा अंतिम करून कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच काही तलावांच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

# 'विकास' दिवा स्टेशनच्या पटरीवर घसरून आपटला...

## असंच काहीसं उत्तर ऐकायला मिळेल!



दिवा न्यूज रोखठोक/एस.के.

**दिवा** : बुधवारी दिव्यात रेल्वे स्थानकावर रेल्वे प्रवाशांचा संताप झाला.कामावर जाण्यास वेळ होत असतानाच लोकलने घोळ घातला.याचा फटका प्रवाशांना बसला.फलाट क्रमांक चार वर येणारी लोकल फलाट क्रमांक दोन वर आल्याने गोंधळ उडाला.या गोंधळात काही महिलांनी मोटरमनच्या केबिनमध्ये प्रवेश केला,संपूर्ण प्रकरण हाताळण्यात दहा ते पंधरा मिनिटे गेली.अखेर गोंधळ मिटला.कामावर जाण्यासाठी ज्या महिला जीवावर उदार होऊन लढल्या त्यांना पोलीस कारवाईला सामोरे जावे लागले.स्वतःच्या कामावर वेळेत जाण्यासाठी सामान्य माणसाचा संघर्ष पोलीस कारवाईसाठी कारणीभूत ठरत असेल तर उपनगरीय रेल्वेचा विकास हरवलाय कुठे?असा प्रश्न निर्माण होतो. दिवा रेल्वे स्थानकात बुधवारी हा संपूर्ण प्रकार घडला. त्याला निमित्त ठरलं दिव्यात सकाळी गर्दीच्या वेळेत प्रवाशांना रेल्वेमध्ये चढायला मिळत नाही या कारणाचे!आता प्रवाशांना सकाळी कामाच्या वेळेस रेल्वे पकडता येत नसेल तर अशी लोकल रेल्वे दिवा स्थानकात थांबून त्याचा फायदा येथील प्रवाशांना काय? याचं उत्तर रेल्वे प्रशासनाने द्यायला हवे.जानेवारी २०१५ ला दिवा स्थानकात प्रवाशांचा मोठा उद्रेक झाला होता.जनतेने उत्स्फूर्तपणे रेलरोको केला होता. या रेल रोकोची चांगलीच धास्ती रेल्वे प्रशासनाने त्यावेळी घेतली होती.

दिवा रेल्वे स्थानकात गर्दीच्या वेळी प्रवाशांना लोकल मध्ये चढायला मिळत नाही. लोकलची संख्या वाढवावी,दिवा स्थानकातून स्वतंत्र लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल पर्यंत सोडावी अश्या प्रमुख मागण्या त्यावेळी येथील जनतेने केल्याआजचा प्रकार काय सांगतो?येथील प्रवाशांना गर्दीच्या वेळी लोकल मध्ये चढण्यास न मिळाल्याने बुधवारची घटना घडली असे साधारणपणे म्हणता येईल.जी स्थिती जानेवारी २०१५ ला होती त्यात फारसा काय फरक पडला?गर्दीच्या वेळी लोकांना लोकल मध्ये चढायला न मिळणे हा महत्त्वाचा प्रश्न तसाच आहे.यावर दिव्यातून स्वतंत्र लोकल सुरू करण्याचा विचार का होत नाही हा जनतेचा सवाल आहे.

रेल्वे स्टेशन सुधारणा,स्थानकात पायाभूत सुविधा,वाढीव तिकीट खिडकी,सरकते जिने,पादचारी पूल ही कामे झाली.ती व्हायलाच हवी होती..हा बदल नक्कीच दखल घेण्याजोगा आहे.याबाबद्दल लोकप्रतिनिधी आणि रेल्वे प्रशासनाला धन्यवाद द्यायला हवेत.मात्र रेल्वे स्टेशन वर लोकं फेरफटका मारायला येत नाहीत तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करायला येतातआणि त्यांचा प्रवास सुखकर करणे हे रेल्वेचे प्रमुख कर्तव्य आहे असे आमचे मत आहे.

मागील काही वर्षांत दिवा स्थानकात गर्दीच्या वेळी येथील प्रवाशांचा रेल्वे प्रवास सुरळीत व्हावा यादृष्टीने ठोस उपाययोजना झाल्या नाहीत हेही तितकेच वास्तव आहे. सकाळी जीव मुठीत घेऊन दिव्यातील जनतेला प्रवास करावा लागतो. कल्याणच्या दिशेने भरून येणाऱ्या लोकल मध्ये चढण्यास नागरिकांना संघर्ष करावा लागतो स्टेशनचे सुशोभीकरण करण्या आधी येथून गर्दीच्या वेळी लोकल प्रशासनाने सोडली तर दिवावासीय रेल्वे प्रशासनाचे अधिक धन्यवाद मानतील,इतका त्रास येथील प्रवासी रोज सकाळी सोसत असतात.

ज्या पद्धतीने दिव्यातील लोकसंख्या वाढत आहे, ते पाहता दिवा जंक्शन वरून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल या दरम्यान सकाळी गर्दीच्या वेळी गाड्या सोडल्यास प्रवाशांचा प्रवास सुखकर होईलअन्यथा कितीही स्टेशन रंगरंगोटी करून झगमगाट केला तरी दिव्यातील चाकरमानी वर्गाचा रोजचा संघर्ष संपणार नाही. दिवा स्टेशनचा कोट्यवधी रुपये खर्च करून कायापालट केला आणि येथील प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी स्वतंत्र लोकल सुरू केली नाहीतशी पावलं रेल्वेने टाकली नाहीत आणि सकाळच्या गर्दीत लोकल मध्ये चढण्यासाठी संघर्ष करणाऱ्या संतापलेल्या रेल्वे प्रवाशाला विचारलंविकास कुठं आहे?... तर मात्र, विकासदिवा स्टेशनच्या पटरीवर घसरून आपटला...असंच काहीसं उत्तर तो प्रवासी देईल!

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि.१४ ऑगस्ट २०२३ | ८ | अंक-२
www.diwanews.com

## आर्थिक चक्र चालू ठेवण्यासाठी तरुणांनी प्रॅक्टिकल ॲप्रोच ठेवावा – आदिती तटकरे

**ठाणे :** कोणत्याही घरातील आर्थिक चक्र चालू ठेवण्यासाठी फायनान्शियल स्टेबेलिटी महत्वाची आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा नोकरी महोत्सव तरुणांना संधी देतो. या संधीचे सोने करण्यासाठी तरुणांनी प्रॅक्टिकल ॲप्रोच ठेवावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती सुनील तटकरे यांनी रविवारी ठाण्यात केले. तर ठाणे राष्ट्रवादी नोकरी महोत्सवात सहभागी प्रत्येक तरुणाला नोकरी मिळेल, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे आनंद परांजपे यांनी दिले.

# भर पावसात दिव्यात पाणीटंचाई

## ठाणे महापालिकेच्या निषेधार्थ मडके फोडो आंदोलन करणार – रोहिदास मुंडे

**दिवा:**–नवीन पाईपलाईनच्या लोकार्पणानंतर दिव्यातील विविध भागात भीषण पाणीटंचाई आहे.भर पावसात असणाऱ्या या पाणीटंचाईला पालिका प्रशासन आणि मनमानी करणारे शिवसेनेचे स्थानिक नेते जबाबदार आहेत. दिव्यात असणाऱ्या मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी दिवावासीयांच्या वतीने महापालिका मुख्यालयासमोर मडके फोडो आंदोलन करणार असल्याचे भाजपचे दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांनी जाहीर केले आहे.

जूनमध्ये दिवा शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने मुख्य जलवाहिनीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. मात्र या लोकार्पण सोहळ्यानंतरच दिवा शहरातील अनेक भागात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून अनेक भागांमध्ये दोन ते तीन दिवस आड करून पाणी येते.काही भागांना पाणी मिळत नाही. भर पावसात दिव्यात टँकर द्वारे नागरिकांना पाणी घ्यावे लागते.टँकर लॉबी चालावी म्हणून दिव्यातील काही स्थानिक शिवसेना नेत्यांकडून जाणीवपूर्वक पाणीटंचाई निर्माण केली जात आहे का? असा सवाल ही भाजपचे रोहिदास मुंडे यांनी उपस्थित केला आहे. दिवा शहरातील नागरिकांना पाणी बिल भरूनही पाणी मिळत नाही याकडे रोहिदास मुंडे यांनी लक्ष वेधले आहे.भर पावसात दिवा शहरात भीषण पाणी टंचाई असून शहरातील नागरिक पाण्यासाठी वन वन भटकताना दिसतात.नागरिकांचा प्रत्येक सुट्टीचा रविवार हा पाणी लाईन चेक करणे आणि पाणी प्रश्न सोडवण्यासाठी जातो. पावसाळ्यात अशी परिस्थिती असेल तर अन्य दिवसात येथील नागरिकांना किती यातना होत असतील असा प्रश्न रोहिदास मुंडे यांनी विचारला आहे. पालिका प्रशासनाला व पालिका प्रशासन ज्यांच्या इशाऱ्यावर चालतं त्यांना दिव्यातील जनतेच्या पाणी प्रश्नाशी काही देणं घेणं नाही.नागरिकांनी फक्त यांच्या बंगल्यांवर हजेरी लावायची आणि पाण्यासाठी याचना करायची अशीच यांची भावना असून नागरिकांना पाणी दिल्यास नागरिक पुन्हा आपल्या बंगल्यावर येणार नाहीत, या हेतूने येथील तथाकथित कार्यसम्राट नेते दिव्यातील पाणी प्रश्न सोडवत नाहीत असा आरोपच रोहिदास मुंडे यांनी केला आहे.महापालिका प्रशासन दिव्यातील पाणी समस्या सोडवण्यात पूर्णतः अपयशी ठरले असून या प्रशासनाचा निषेध करण्यासाठी महापालिका मुख्यालयासमोर मडके फोडो आंदोलन करणार असल्याचे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.दिव्यातील जनतेच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन केले जाणार असल्याचे रोहिदास मुंडे यांनी सांगितले आहे.



# ठाकरेंच्या शिवसेनेची दिवा लोकल सुरू करण्याची मागणी

**दिवा:–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शाखाप्रमुख अजित माने, श्री संजय निकम व शिवसेना पदाधिकारी यांनी खासदार राजन विचारे यांची भेट घेऊन दिवा ते सीएसटी रेल्वे सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी केली.**

